**Raj Bhavan Maharashtra**
**&**
**Punyashlok Ahilyadevi Holkar**
**Solapur University,**
**Health Centre and IQAC**



# World Organ Donation Day Awareness Talk by

## Dr. Dhadake Vitthal





**Followed by interactive session**

**August 13th 2020, 4.30 pm**

**Live at: https://youtu.be/RDOIwom8A9c**

लोकमत

# स्वेच्छा अवयवदानाची चळवळ वाढावी

## विठ्ठल धडके : विद्यापीठातर्फे जागतिक अवयवदान दिनानिमित्त कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**सोलापूर** : भारतात दररोज ६ हजार रुग्ण अवयव न मिळाल्यामुळे मृत्युमुखी पडतात. दर १७ मिनिटाला एका रुग्णाचा मृत्यू होतो. अपघातात मरण पावणाऱ्या दहा लाख लोकांमध्ये केवळ ५० नागरिक अवयवदान करण्यास तयार होतात. एका मेंदुमृत व्यक्तीने अवयवदान केल्यास नऊ जणांचे प्राण वाचू शकतात. त्यामुळे देशात स्वेच्छा अवयवदानाची चळवळ वाढणे अतिशय गरजेचे असल्याचे मत वैशंपायन स्मृती वैद्यकीय महाविद्यालयातील प्रा. डॉ. विठ्ठल धडके यांनी व्यक्त केले.

गुरुवारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातर्फे कुलपती भगतसिंह कोश्यारी यांच्या प्रेरणेतून जागतिक अवयवदान दिनानिमित्त ऑनलाईन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात डॉ. धडके यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. मृणालिनी फडणवीस होत्या. विद्यापीठाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अभिजित जगताप यांनी स्वागत व प्रास्ताविक करुन कार्यक्रमाची माहिती दिली. यावेळी प्र. कुलगुरु देबेंद्रनाथ मिश्रा, कुलसचिव डॉ. विकास घुटे, मानवविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. विकास कदम, वित्त व लेखाधिकारी श्रेणिक शहा यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. धडके म्हणाले की, १९९४ मध्ये अवयवदानाविषयी कायदा करुन त्यासंदर्भात नियम तयार करण्यात आले आहेत. १५ लाख किडन्यांची गरज असताना केवळ ५ हजार रुग्णांना किडनी मिळते. त्यामुळे मृत्यूच्या प्रमाणात मोठ्या संख्येने वाढ होत आहे. यावर मात करण्याकरिता ब्रेनडेड व अपघातात मरण पावणाऱ्या मृतांच्या नातेवाईकांनी जास्तीत जास्त प्रमाणात अवयवदान करुन इतरांचे जीव वाचवण्यासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन डॉ. धडके यांनी केले.



### अवयवदानाची गरज

**अवयवदानाच्या जनजागृतीसाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठानेही पुढाकार घेत आहे. वास्तविक अवयवदानाची खूपच गरज आहे. सोशल वर्कर यांचीही भूमिका यात महत्त्वाची आहे. असे मत कुलगुरु डॉ. मृणालिनी फडणवीस यांनी व्यक्त केले.**

# स्वेच्छा अवयवदानाची चळवळ वाढावी : डॉ. धडके

**संचार प्रतिनिधी**

**सोलापूर, दि. १३-** भारतात दररोज ६ हजार रुग्ण अवयव न मिळाल्यामुळे मृत्युमुखी पडतात. दर १७ मिनिटाला एका रुग्णाचा मृत्यू होतो. अपघातात मरण पावणाऱ्या दहा लाख लोकांमध्ये केवळ ५० नागरिक अवयवदान करण्यास तयार होतात. एका मेंदूमृत व्यक्तीने अवयवदान केल्यास नऊजणांचा प्राण वाचू शकतो. त्यामुळे देशात स्वेच्छा अवयवदानाची चळवळ वाढणे अतिशय गरजेचे असल्याचे मत डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील प्रा. डॉ. विठ्ठल धडके यांनी व्यक्त केले.

गुरुवारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातर्फे कुलपती भगतसिंह कोश्यारी यांच्या प्रेरणेतून जागतिक अवयवदान दिनानिमित्त ऑनलाइन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात डॉ. धडके यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस या होत्या. विद्यापीठाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अभिजित जगताप यांनी स्वागत व प्रास्ताविक करून कार्यक्रमाची माहिती दिली. यावेळी प्र. कुलगुरू देबेंद्रनाथ मिश्रा, कुलसचिव डॉ. विकास घुटे, मानव विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. विकास कदम, वित्त व लेखाधिकारी श्रेणिक शहा यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. धडके म्हणाले की, देशात पहिल्यांदा १९६७ ला केम हॉस्पिटलमध्ये मुंबईत किडनीचे प्रत्यारोपण झाले. त्यानंतर हळूहळू अवयवदानाला सुरुवात झाली. मात्र, आज ज्या प्रमाणात अवयवदानाची चळवळ वाढणे अपेक्षित होते, त्यातुलनेने खूपच कमी प्रमाणात अवयवदान आपल्या देशात होत आहे. १९९४ मध्ये अवयवदानाविषयी कायदा करून त्यासंदर्भात नियम तयार करण्यात आले आहेत. वास्तविक इतर देशांच्या तुलनेने भारतामध्ये अवयवदानाची चळवळ वाढणे आवश्यक आहे. यासंदर्भात सामाजिक प्रबोधन होऊन जनजागृतीची अतिशय आवश्यकता आहे. १५ लाख किडनीची गरज असताना केवळ पाच हजार रुग्णांना किडनी मिळतात. त्यामुळे मृत्यूच्या प्रमाणात मोठ्या संख्येने वाढ होत आहे. यावर मात करण्याकरिता ब्रेन डेड व अपघातात मरण पावणाऱ्या मृतांच्या नातेवाइकांनी जास्तीत जास्त प्रमाणात अवयवदान करून इतरांचे जीव वाचवण्यासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन डॉ. धडके यांनी केले. कुलगुरू डॉ. फडणवीस म्हणाल्या, अवयवदानासंदर्भात जनजागृती वाढविणे खूपच गरजेचे आहे. संलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य, एनएनएस अधिकारी यांनी स्वयंसेवक यांच्या मदतीने अवयवदानाचे महत्त्व पटवून देत अधिक जनजागृती करणे आवश्यक असल्याचे त्या म्हणाल्या.

---

## ी यांच्या हस्ते ध्वजारोहण

लोकप्रतिनिधी, ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक, शहीद जवानांच्या पत्नी किंवा त्यांचे आई-वडील, कोरोना योद्धा डॉक्टर्स, सफाई कामगार, आरोग्य कर्मचारी यांच्यासह या आजारावर मात केलेल्या नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी केले आहे.

# स्वेच्छा अवयवदानाची चळवळ वाढावी: डॉ.धडके

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ ऑगस्ट -**

भारतात दररोज ६ हजार रुग्ण अवयव न मिळाल्यामुळे मृत्युमुखी पडतात. दर १७ मिनिटाला एका रुग्णाचा मृत्यू होतो. अपघातात मरण पावणार्या दहा लाख लोकांमध्ये केवळ ५0 नागरिक अवयव दान करण्यास तयार होतात. एका मेंदू मृत व्यक्तीने अवयव दान केल्यास नऊ जणांचा प्राण वाचू शकतो. त्याम ुळे देशात स्वेच्छा अवयवदानाची चळवळ वाढणे अतिशय गरजेचे असल्याचे मत वैशंपायन स्मृती वैद्यकीय महाविद्यालयातील प्रोफेसर डॉ. विठ्ठल धडके यांनी व्यक्त केले.

गुरुवारी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातर्फे कुलपती भगतसिंह कोश्यारी यांच्या प्रेरणेतून जागतिक अवयवदान दिनानिमित्त ऑनलाईन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात डॉ. धडके यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस या होत्या. विद्यापीठाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. अभिजित जगताप यांनी स्वागत व प्रास्ताविक करून कार्यक्रमाची माहिती दिली. यावेळी प्र कुलगुरू देबेंद्रनाथ मिश्रा, कुलसचिव डॉ. विकास घुटे, मानवविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. विकास कदम, वित्त व लेखाधिकारी श्रेणीक शहा यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरू डॉ. फडणवीस म्हणाल्या, अवयव दानासंदर्भात जनजागृती वाढविणे खूपच गरजेचे आहे. संलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य, एनएनएस अधिकारी यांनी स्वयंसेवक यांच्या मदतीने अवयव दानाचे महत्त्व पटवून देत अधिक जनजागृती करणे आवश्यक आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठानेही यासाठी पुढाकार घेऊन अवयव दान चळवळीत योगदान देत आहे. वास्तविक अवयव दानाची खूपच गरज आहे. सोशल वर्कर यांचीही भूमिका यात महत्त्वाची आहे. त्यांनीही यासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. फडणवीस यांनी यावेळी केले.